आरोग्य सेवक (पुरुष) गट-क या पदावरुन परिचर गट-ड पदावनत करणेबाबत.
(श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर)

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/ CCC /२०२६
अहिल्यानगर, दिनांक- 02/11/२०२६

वाचा - १. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम २७(१)(बी
२. या कार्यालयाकडील आदेश क्र. आरोग्य/कार्या-२/आस्था-३/६६८/२०२६, दिनांक- १३/०६/२०२६
३. श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), यांचा दिनांक- १०/०८/२०२६ रोजीचा अर्ज
४. वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर यांचेकडील पत्र क्र. वशि/आस्था/५६६/२०२६, दिनांक- १२/१०/२०२६

श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), यांना संदर्भ क्र.२ चे आदेशान्वये परिचर गट-ड या संवर्गातून आरोग्य सेवक (पुरुष) गट-क या पदावर उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर येथे पदोन्नती देण्यात आलेली आहे.

तथापि, श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर यांनी संदर्भ क्र.३ च्या विनंती अर्जाव्दारे कौटूंबिक कारणास्तव आरोग्य सेवक (पुरुष) गट-क या पदावरुन परिचर गट-ड पदावनत करणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार, संदर्भ क्र.१ मधील तरतुदीनुसार मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर यांना आरोग्य सेवक (पुरुष) गट-क या पदावरुन परिचर गट-ड या पदावर इमाव प्रवर्गात सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-१ (१५०००-४७६००) या वेतनश्रेणीमध्ये ---सामान्य प्रशासन विभाग जि.प.--- येथे पदस्थापना देत आहे.

तसेच, श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), यांची परिचर गट-ड या पदावर वेतन निश्चिती करतांना त्यांना आरोग्य सेवक (पुरुष) या पदावर पदोन्नती दिली नसती तर त्यांनी जे वेतन घेतले असते. त्या प्रमाणे वेतन निश्चिती करणेत यावी. तसेच यापुढे श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष), उपकेंद्र-टाकळीकाझी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय नाही. सदर आदेशाची अंमलबजावणी तात्कळ करण्यात येऊन त्याची नोंद संबंधितांचे मुळ सेवा पुस्तकात घेण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या **www.nagarzp.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्यांचा संकेतांक ---20260210007384--- असा आहे.

Digitally signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 02-11-2026 17:21:03
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.शाम नानासाहेब लोंढे, आरोग्य सेवक (पुरुष),
प्रत व द्वारा :- वैदयकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र-टाकळीकाझी, ता.अ.नगर
प्रत :-मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत :- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अ.नगर, - जिल्हा अहिल्यानगर
प्रत :- तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती अहिल्यानगर, ता. जिल्हा अहिल्यानगर
प्रत:- ~~उपमुख्यकार्यकारी अधिकारी (सा) जिल्हा परिषद अहिल्यानगर~~
प्रत:- निवड नस्ती